मा. कार्यकारी परिषद दि. २९/७/९४.
विषय क्र. ए-८०८/९४ चे सहपत्र

प - १३३

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

## दि. २६ जुलै, ९४ रोजी संपन्न झालेल्या मा. परीक्षा [सल्लागार] समितीचे सभावृत्त

मा. परीक्षा पध्दत [सल्लागार] समितीची सन १९९४ मधील तिसरी सभा मंगळवार दिनांक २६ जुलै, ९४ रोजी दुपारी १-०० वाजता विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

[१] मा. डॉ. निं. कृ. ठाकरे, कुलगुरु [अध्यक्ष]

[२] मा. ॲड. सु. भि. पाटील

[३] मा. श्री. अ. ध. वसावे

[४] मा. प्रा. डी. एच. महाजन

[५] मा. प्राचार्य एस. एस. पटेल

[६] मा. डॉ. डी. जी. हुंडीवाले

[७] मा. प्राचार्य डॉ. के. आर. सोनवणे

[८] मा. प्रा. एम. एल. नानकर

सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

[१] मागील सभेचे सभावृत्त वाचून कायम करणे.

ठराव क्र. इपीसी-१/२६.७.९४

दि. १२ मे, ९४ रोजी झालेल्या मा. परीक्षा पध्दत [सल्लागार] समितीच्या बैठकीचे सभावृत्त वाचून मागील सभावृत्तात जे अहवाल मा. श्री. अ. ध. वसावे समितीकडे यावे असे ठराव आहेत त्यापैकी फक्त ज. जि. म. वि. प्र. स. चे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, जळगाव यांचे संदर्भातील अहवाल मा. वसावे समितीकडे यावे अशी दुरुस्ती सुचवून कायम करण्यात आले. तसेच संमत झालेल्या ठरावावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

[२] मा. प्रा. एस. एस. नाद्रे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या दक्षता पथकाचा अहवाल **विचारार्थ**.

ठराव क्र. इपीसी-२/२६.७.९४

अ] मा. प्रा. एस. एस. नाद्रे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या दक्षता पथकाच्या अहवालाची मा. परीक्षा पध्दत [सल्लागार] समितीने नोंद घेतली.

ब] दक्षता पथकाच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे धुळे जिल्ह्यातील धडगांव, अक्कलकुवा, वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा, तळोदा, एस. एस. व्ही. पी. संस्थेचे कला, वाणिज्य महाविद्यालय, धुळे, जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार, नरडाणा महाविद्यालय, [illegible] महिला महाविद्यालय, नंदुरबार, अभय महिला महाविद्यालय, धुळे या महाविद्यालयात परीक्षा व्यवस्थितरित्या सुरु नसल्याचे आढळून आल्याने तसेच या महाविद्यालयांमध्ये परीक्षेत

..२..

[६] एम. एड. [फिजीकल] परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी हिंदी माध्यमातून उत्तरपत्रिका लिहिल्या बाबत विचार करणे.

ठराव क्र. इपीसी-६/२६.७.९४ :-

एम. एड. [फिजीकल] परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी हिंदी माध्यमातून उत्तरपत्रिका लिहिल्या बाबत विचार करण्यात आला असून त्या संदर्भात मराठी किंवा इंग्रजी या भाषेतून उत्तरपत्रिका लिहिल्या असतील तरच त्या उत्तरपत्रिका तपासाव्यात अशा प्रकारचे परिपत्रक परीक्षकांना पाठवावे. हिंदी माध्यमाच्या बाबतीत सी. सी. आय. एम. [भारतीय चिकीत्सा केंद्रीय परिषद] चे आयुर्वेद विद्याशाखेच्या संदर्भात पत्र आलेले आहे. त्या पत्राची माहिती मा. कुलगुरु यांनी समितीला दिली. हिंदी भाषिकांसाठी मान्यताप्राप्त शिक्षकांची सोय सुध्दा महाविद्यालयाने केली पाहिजे इ. सर्व बाबींचा विचार करणेसाठी सदरचा विषय मा. कार्यकारी परिषदेपुढे पुढील विचारार्थ ठेवावा अशी शिफारस करण्यात आली.

[७] प्रा. डॉ. एस. एन. पांडे रक्षणकर्ता [कस्टोडियन], जी. टी. पी. महाविद्यालय, नंदुरबार यांचा अहवाल विचारार्थ.

ठराव क्र. इपीसी-७/२६.७.९४

अ] प्रा. एस. एन. पांडे, रक्षणकर्ता [कस्टोडियन], जी. टी. पी. महाविद्यालय, नंदुरबार यांच्या अहवालाची समितीने नोंद घेतली.

ब] डॉ. पांडे यांनी सन १९९४ नंतर विद्यापीठाने परीक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाकडे सोपवावी या संदर्भात शिफारस केलेली होती. परंतु नंदुरबार शहरातील महाविद्यालयाच्या बाबतीत गैरप्रकाराचे प्रमाण विचारात घेता संपूर्ण नंदुरबार शहरात जी महाविद्यालये आहेत, जी. टी. पी. महाविद्यालय, जिजामाता महाविद्यालय, ट्रायबल महिला या महाविद्यालयांमधील पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या परीक्षांसाठी स्वतंत्र कस्टोडियन नियुक्त करण्याच्या संदर्भात व त्याचे मार्फत परीक्षा घेण्याच्या बाबतीत मा. कार्यकारी परिषदेने स्वतंत्रपणे विचार करावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

[८] प्रा. पी. टी. चौधरी, वरिष्ठ पर्यवेक्षक, अभियांत्रिकी महाविद्यालय, फैजपूर यांचा आलेला अहवाल विचारार्थ.

ठराव क्र. इपीसी-८/२६.७.९४

प्रा. पी. टी. चौधरी, वरिष्ठ पर्यवेक्षक, अभियांत्रिकी महाविद्यालय, फैजपूर यांच्या अहवालाची मा. परीक्षा पध्दत [सल्लागार] समितीने नोंद घेतली.

[९] प्रा. पी. जी. अभ्यंकर, संचालक, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प, एल. एल. बी. /बी. एस. एल. परीक्षा एप्रिल, ९४ यांचा आलेला अहवाल विचारार्थ.

ठराव क्र. इपी. सी-९/२६.७.९४.

प्रा. पी. जी. अभ्यंकर, संचालक, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प एल. एल. बी. /बी. एस. एल. परीक्षा एप्रिल, ९४ यांच्या अहवालाची समितीने नोंद घेतली.

[१०] मा. प्राचार्य, श्रीमती जी. जी. खडसे विज्ञान महाविद्यालय, एदलाबाद व मा. प्राचार्य, विज्ञान महाविद्यालय, पारोळा यांच्या आलेल्या अहवालावर विचार करणे.

ठराव क्र. इपीसी–१०/२६.७.९४

---

अ] मा. प्राचार्य, श्रीमती जी. खडसे विज्ञान महाविद्यालय, एदलाबाद व मा. प्राचार्य, विज्ञान महाविद्यालय, पारोळा आलेल्या अहवालाच्या बाबतीत नोंद घेण्यात आली.
ब] मा. प्राचार्य, विज्ञान म. ालय, पारोळा यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, महाविद्यालयाच्या प्रवेशद्वा कुलुप होते; हे दक्षता पथकाचे म्हणणे बरोबर नाही, मुख्य प्रवेशद्वारावर कुलुप लावण्य आलेले नव्हते. महाविद्यालयातील कार्यालयाच्या इमारतीला दोन प्रवेशद्वार आहेत, त्या ठिकाणी एका प्रवेशद्वाराला कुलुप लावण्यात आले होते. दक्षता पथकाने केवळ आकसभावनेने तक्रार केलेली दिसते, या संदर्भात परीक्षा पध्दत [गैरप्रकार] समितीने नोंद घेतली असून प्राचार्यांचे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही. कारण कार्यालयात विद्यार्थ्यांनी येऊ नये म्हणून कार्यालयाला कुलुप लावलेले होते व प्रवेशद्वारावर कुलुप नव्हते म्हणजेच विद्यार्थी प्रवेशद्वारामार्फत येऊ शकत होते. सबब या सर्व पत्राचा व दक्षता पथकाने दिलेल्या अहवालाचा विचार करता धुळे जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या प्राचार्यांची जशी सभा बोलाविण्याचे ठरले आहे त्यानुसार जळगाव जिल्ह्यातील ज्या ज्या महाविद्यालयात जास्त गैरप्रकार आलेले आहेत, अशा महाविद्यालया या प्राचार्यांची मा. कुलगुरु यांच्या समवेत सभा बोलवून मा. प्राचार्यांना यासाठी पाचारण करण्यात यावे अशी शिफारस करण्यात येत आहे.

[११] मा. प्राचार्य, ज. जि. म. वि. प्र. ... चे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, जळगाव यांचे दिनांक ३.६.९४ चे आलेल्या पत्रावर विचार करणे.

ठराव क्र. इपीसी–११/२६.७.९४

---

मा. प्राचार्य, ज. जि. म. वि. प्र. ... चे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, जळगाव यांचे दि. ३.६.९४ च्या आलेल्या पत्राची नोंद घेण्यात आली. महाविद्यालयाचे आवारात असलेले मंगल कार्यालय परीक्षा कालावधीमध्ये सभा सम्मेलने व लग्न कार्यासाठी देऊ नये याबाबतीत प्राचार्यांनी संस्था प्रमुखांना वेळोवेळी सूचना केल्या होत्या परंतु यासंदर्भात संस्था प्रमुखांनी काळजी घेऊन परीक्षा कालावधीमध्ये मंगल कार्यालय लग्न समारंभासाठी देऊ नये व विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही या दृष्टीने काळजी घेण्यात यावी असे पत्र संस्था चालकांना देण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली.

[१२] द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम. या अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प आयोजित करणेबाबत विचार करणे.

ठराव क्र. इपीसी–१२/२६.७.९४

---

केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प आयोजित करण्याच्या संदर्भात कार्यालयाने ठेवलेल्या पत्राचा विचार करता सन १९९५ मध्ये केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प आयोजित करण्यात यावे या संदर्भात कार्यालयाने सर्व माहिती तयार करावी. सन १९९५ मध्ये सर्वसाधारणपणे प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. या सर्व वर्गांच्या परीक्षांचे उत्तरपत्रिकांचे केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प आयोजित करण्यात यावे. त्यासाठी खालीलप्रमाणे केंद्रीय ..५..

मूल्यमापनाचे स्थान निश्चित करावे.

१] प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष वाणिज्य आणि विज्ञान या वर्गाच्या उत्तरपत्रिकांचे केंद्रिय मूल्यमापन एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर येथे करण्यात यावे.

२] प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष कला या वर्गाच्या उत्तरपत्रिकांचे केंद्रीय मूल्यमापन प्रताप महाविद्यालय, अमळनेर व प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर येथे करण्यात यावे.

अशी शिफारस करण्यात आली असून या संदर्भात महाविद्यालयांचे मा.प्राचार्यांशी संपर्क साधण्यात यावा. वरील वर्गाच्या परीक्षा संपल्याबरोबर ४ दिवसांत सर्व उत्तरपत्रिका सदर ठिकाणी पाठविण्याची व्यवस्था विद्यापीठाने करावी. या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पासाठी जे परीक्षक बाहेरगावाहून येतील त्यांची संबंधीत महाविद्यालयाच्या वसतीगृहात राहण्याची सोय करण्याबाबतची विनंती मा.प्राचार्यांना करावी व सदरचा प्रकल्प राबविण्यात यावा.

३] बी.एड.[जनरल/फिजिकल] परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे केंद्रीय मूल्यमापन शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार येथे करण्यात यावे व त्या संदर्भात मा.प्राचार्यांशी संपर्क साधावा

४] अभियांत्रिकी व विधी विद्याशाखेच्या परीक्षांचे उत्तरपत्रिकांचे केंद्रीय मूल्यमापन जळगांव येथे आयोजित करण्यात यावे अशी शिफारस करण्यात येत आहे.

१३] मा. निवृत्त प्राचार्य सी.आय.मोरे यांच्या दि. ६ जून, ९४ च्या पत्रावर विचार करणे.

<u>ठराव क्र. इपीसी-१३/२६/७/९४.</u>

मा. निवृत्त प्राचार्य सी.आय.मोरे यांच्या दि. ६ जून, ९४ च्या पत्राची समितीने नोंद घेतली. प्राचार्य सी.आय.मोरे यांनी उत्तरपत्रिकांच्या संदर्भात ज्या गोष्टी आढळून आल्या आहेत त्या नमूद करून विद्यापीठास कळविलेल्या आहे. त्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात येऊन त्यांचे आभार मानण्यात यावे अशी शिफारस करण्यात येत आहे.

१४] मा.प्राचार्य, ट्रायबल एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय नंदुरबार यांचे दि. २०/६/९४ च्या पत्रावर विचार करणे.

<u>ठराव क्र. इपीसी-१४/२६/७/१९९४.</u>

मा.प्राचार्य, ट्रायबल एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, नंदुरबार यांचे दि.२०/६/९४ च्या पत्राची नोंद घेण्यात येऊन सदरचा विषय मा.कार्यकारी परिषदेच्या विचारार्थ ठेवण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली.

१५] सन १९९४ च्या द्वितीयार्धात घ्यावयाच्या परीक्षांबाबत विचार करणे.

<u>ठराव क्र. इपीसी-१५/२६/७/९४.</u>

सन १९९४ च्या द्वितीयार्धात कार्यालयाने शिफारस केल्याप्रमाणे सर्व परीक्षा घेण्यात याव्यात. प्रामुख्याने टी.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. च्या वर्गाच्या परीक्षा घेण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

१६] विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका परीक्षेच्यावेळी विद्यार्थ्यांनी कशा रितीने लिहावयाच्या या संदर्भात विद्यार्थ्यांना निश्चित सूचना देणेबाबत विचार करणे.

ठराव क्र.इपीसी-१६/२६/७/९४.

उभाविने आता १६ पानी उत्तरपत्रिका ठेवलेली आहे. विद्यार्थ्यांनी १६ पानी उत्तरपत्रिका पूर्ण लिहिली आहे याची खात्री झाल्यानंतर कनिष्ठ पर्यवेक्षकांनी त्यास ८ पानांची जास्तीची उत्तरपत्रिका द्यावी. उत्तरपत्रिकेमध्ये विद्यार्थी कोरी पाने सोडतात या संदर्भात गैरप्रकार होण्याची शक्यता असल्याने परीक्षा केंद्रावर जे वरिष्ठ व कनिष्ठ पर्यवेक्षक असतात त्यांनी विद्यार्थ्याने उत्तरपत्रिका पूर्ण लिहिलेली आहे किंवा नाही याची खात्री करण्याच्या संदर्भात तसेच विद्यार्थ्याने जी कोरी पाने सोडलेली असतील त्या को-या पानांवर कनिष्ठ पर्यवेक्षकाने काट मारण्याच्या संदर्भात व काट मार-या नंतर सही करु नये असे परिपत्रक महाविद्यालयांना पाठवावे अशी शिफारस करण्यात येत आहे.

१७] मा.प्रा.डॉ.एस.एस.मायी, वरिष्ठ पर्यवेक्षक [बहि:स्थ] व प्रा.डॉ.पी.बी.चव्हाण अंत:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक, ज.जि.म.वि.प्र.स.स. चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जळगांव यांचे दि. १४/६/९४ च्या पत्रावर विचार करणे.

ठराव क्र.इपीसी-१७/२६/७/९४.

मा.प्रा.डॉ.एस.एस.मायी वरिष्ठ पर्यवेक्षक व प्रा.डॉ.पी.बी.चव्हाण, अंत:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक, ज.जि.म.वि.प्र.स.स. चे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, जळगांव यांचे दि. १४/६/९४ च्या पत्राची समितीने नोंद घेतली.

१८] मा.प्राचार्य व्ही.व्ही.पहळाचे लि.गो.पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री यांचे दि. २४/६/९४ चे पत्रावर विचार करणे.

ठराव क्र.इपीसी-१८/२६/७/९४.

सदरचा विषय मा.कार्यकारी परिषदेपुढे स्वतंत्रपणे विचारार्थ ठेवण्यात यावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

१९] मा.प्रा.डी.एच.महाजन, संचालक, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प, प्रथम, द्वितीय व तृतिय वर्ष अभियांत्रिकी परीक्षा, मे, ९४ यांचा केंद्रीय मूल्यमापन संदर्भातील आलेला अहवाल विचारार्थ सादर.

ठराव क्र.इपीसी-१९/२६/७/९४.

मा.प्रा.डी.एच.महाजन यांनी संचालक म्हणून स्वीकृती देवून प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष अभियांत्रिकी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे केंद्रीय मूल्यमापन अत्यंत यशस्वी रित्या पार पाडले. याबाबत आलेल्या अहवालाची परीक्षा पध्दत [सल्लागार] समितीने नोंद घेतली.

[२०] सन १९९४ च्या दिनदर्शिका वर्षाच्या द्वितीयार्धात उमविने घ्यावयाच्या लेखी परीक्षांचे परीक्षा केंद्र जाहीर करणे बाबत.

ठराव क्र.इपीसी-२०/२६.७.९४

सन १९९४ च्या द्वितीयार्धात घ्यावयाच्या परीक्षांसाठी कार्यालयाने तयार केलेल्या परीक्षा स्थान व परीक्षा केंद्र या परिपत्रकाची नोंद घेतली असून ज्या महाविद्यालयामध्ये लेखी परीक्षेसाठी कमी विद्यार्थी आहेत व एकाच गावात एकापेक्षा जास्त महाविद्यालये आहेत अशा महाविद्यालयांमध्ये टी.वाय.बी.ए/बी.कॉम./बी.एससी. च्या परीक्षा विभागून किंवा एकाच महाविद्यालयात परीक्षा स्थान निश्चित करण्यात यावे. परीक्षा केंद्र निश्चित करण्याबाबतचे सर्व अधिकार मा. कुलगुरु यांना राहतील अशी शिफारस करण्यात येत आहे.

[२१] सन १९९४ च्या दिनदर्शिका वर्षाच्या द्वितीयार्धात उमविने घ्यावयाच्या लेखी परीक्षांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या व परीक्षेच्या संभाव्य तारखा याबाबत कार्यालयाने तयार केलेले परिपत्रक विचारार्थ सादर.

ठराव क्र.इपीसी-२१/२६.७.९४

सन १९९४ च्या द्वितीयार्धात उमविने घ्यावयाच्या परीक्षेचा कार्यक्रम, विद्यार्थ्यांनी विलंब शुल्क विरहीत व विलंब शुल्कासहीत परीक्षा अर्ज भरण्याची तारीख व महाविद्यालयाने विलंब शुल्क विरहीत व विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे सादर करण्याची तारीख समितीपुढे वाचून दाखविण्यात आल्या. त्याची समितीने नोंद घेतली. त्याप्रमाणे महाविद्यालयांना परिपत्रक पाठविण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली.

[२२] सन १९९४ च्या प्रथमार्धात उमविने घेतलेल्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासत असतांना ज्या त्रुटी आढळून आल्या त्या त्रुटी परीक्षकांनी विद्यापीठास कळविलेल्या आहेत त्याची नोंद घेणे.

ठराव क्र.इपीसी-२२/२६.७.९४

सन १९९४ च्या प्रथमार्धात ज्या परीक्षा घेण्यात आल्या त्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका विविध परीक्षकांकडे तपासण्यासाठी पाठविण्यात आल्या होत्या. त्या उत्तरपत्रिका तपासत असतांना परीक्षकांना ज्या त्रुटी आढळून आल्या त्या त्रुटी संबंधित परीक्षकांनी विद्यापीठास कळविलेल्या आहे. त्यात कला विद्याशाखेमध्ये एकूण ३१ प्राध्यापकांनी [परीक्षकांनी], विज्ञान विद्याशाखेतील एकूण ११ परीक्षकांनी व वाणिज्य विद्याशाखेतील ८ परीक्षक प्राध्यापकांनी व एम.एड.चे परीक्षक प्राचार्य शांबरे एम.ए. परीक्षक यांनी त्रुटी कळविलेल्या आहेत. परीक्षकांनी ज्या त्रुटी कळविल्या त्या त्रुटींच्या संदर्भात महाविद्यालयांना पत्र पाठवून त्रुटींच्या बाबतीत जे कनिष्ठ पर्यवेक्षक जबाबदार आहेत त्यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेले आहे.

..८..

सदरचे अहवाल मा. गैरप्रकार चौकशी [अध्यादेश १६४] समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात यावे व ज्या परीक्षकांनी चांगले काम केले आहे त्याबाबतीत विद्यापीठाने त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानलेले आहे. सदर आभारपत्र सर्वांना पाठवून विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीची समितीने नोंद घेतली.

वरील प्रमाणे झालेले ठराव मा. कार्यकारी परिषदेच्या मंजुरीसाठी शिफारशीसह सादर.

अध्यक्ष

परीक्षा पद्धत [सल्लागार] समिती